## सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–००१९७–२०१९

## नियमित दिवाणी दावा क्र. ४३/२०१९

## निशाणी क्र. १३० वरील आदेश

प्रस्ततुचा अर्ज वादी याने प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होवून त्याचे वारस रेकॉर्ड घेवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीने आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, सदरील दावा वादीने प्रतिवादी विरुध्द वाटपासाठी दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. ४ सुमित्रा आत्माराम मांडवकर या दि. ०५/०४/२०२४ रोजी गाव मौजे पोंभुर्ले येथे मयत झाल्या आहेत. सदर प्रतिवादीच्या मृत्युबाबत वादीस पुरेशी माहिती नव्हती. तसेच सदरचे वारस हे मुदतीत दाखल करावयाचे असतात याचे ज्ञात नसल्यामुळे सदर प्रतिवादीचे वारस मुदतीत दाखल करता आलेले नाहीत. त्यामुळे वादीचे वारस दाखल करण्यास विलंब झाला आहे. तरी सदर प्रतिवादीचे वारस दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येवुन सदर प्रतिवादीचे वारस दाखल करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवून सदरचा अर्ज हा खोटा आहे असे सांगितले आहे.

४. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादीने निशाणी क्र.१२८ येथे मयत प्रतिवादी क्र.४ चा मृत्यूचा दाखला हजर केला आहे. सदरच्या मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.४ सुमित्रा आत्माराम मांडवकर या दि.०५/०४/२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केलेला आहे. विलांबाबातचे वादीचे कारण स्विकारार्ह नाही. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व वादी, प्रतिवादी

यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- आदेश -**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग यांस रक्कम रुपये १००/- देण्याच्या अटीवर मयत प्रतिवादी क्र.४ यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ करणेत येत आहे.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2025.01.08 16:28:39 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.

दिनांकः ०८/०१/२०२५